# अखिल भारतीय निबंधलेखन उपक्रम २०१०

## युवकवर्गाला आवाहन

संयुक्त राष्ट्रांच्या आंतरराष्ट्रीय युवकवर्षाच्या अनुषंगाने, श्री राम चंद्र मिशन संयुक्त राष्ट्र माहिती केंद्र (भारत व भूतान)च्या सहयोगाने सादर करीत आहे, 'अखिल भारतीय निबंध लेखन उपक्रम २०१०'.

तुमच्यासाठी समर्पित असलेल्या या वर्षात आम्ही तुम्हाला, युवक वर्गाला, पुढे येऊन खाली दिलेल्या विषयांवर तुमचे विचार व कल्पना मांडण्यासाठी आमंत्रित करीत आहोत, ज्यांची आखणी तुम्हाला आत्मपरिक्षण व स्व-मूल्यांकन करण्याची अद्वितीय संधी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने केली गेली आहे.

## विषय

**अखिल भारतीय निबंध लेखन उपक्रम २०१०ची मध्यवर्ती कल्पना - युवावस्था : आश्वासनांचा आणि परिश्रम करण्याचा काळ.**

**गट - १ (इ. ६वी ते ९वी) : चारित्र्य जीवनाचे रक्षण करते. (शब्दमर्यादा ७५०)**

**विचारार्थ मुद्दे**

- पी. बी. फिजवॉटर एकदा म्हणाले ''चारित्र्य म्हणजे एखाद्याने निवडलेल्या गोष्टींची गोळाबेरीज.'' मग योग्य तीच निवड करण्याचा खात्रीशीर मार्ग कोणता?
- युवावस्था हा जीवनातील काळ अशा मोहांच्या वर्चस्वाखाली असतो जे एखाद्याच्या योग्य-अयोग्य ठरवण्याच्या क्षमतेत हस्तक्षेप करतात. चारित्र्य ही अशी भिंत आहे जी युवकांनी स्वत:भोवती बांधून मोहांच्या भीषण हल्ल्यापासून स्वत:चे संरक्षण केले पाहिजे.

**गट - २ (इ. १०वी ते १२वी) : स्वातंत्र्याचा अर्थ स्वैराचार नाही तर स्वत:साठी योग्य असलेली गोष्ट निवडण्याचे शहाणपण असा आहे. (शब्दमर्यादा १०००)**

**विचारार्थ मुद्दे**

- स्वातंत्र्य हा बऱ्याच वेळा चुकीच्या अर्थाने घेतला जाणारा शब्द पिढ्यांदरम्यान होणाऱ्या विवादातील कळीचा मुद्दा आहे. फार पूर्वीपासून युवावर्ग परिवर्तनाचा पुरस्कार त्यांना हव्या त्या गोष्टी करण्यासाठीचा अनिर्बंध परवाना असा करताना दिसत आहे आणि या प्रक्रियेत नियंत्रण आणि मार्गदर्शनाच्या महत्त्वाला कमी लेखताना दिसत आहे.
- जबाबदारीविरहित स्वातंत्र्याचा विचार केला जाऊ शकतो का? मग स्वत:प्रती असलेल्या जबाबदारीच्या दृष्टिकोनातून विचार करता स्वातंत्र्याचा खरा अर्थ काय?

**गट - ३ (पदवी व पदव्युत्तर) : महत्त्वाकांक्षेकडून आकांक्षेकडे, मिळवण्याकडून बनण्याकडे. (शब्दमर्यादा १०००)**

**विचारार्थ मुद्दे**

- महत्त्वाकांक्षा आणि त्यात प्रबळ असणारी संग्रह करण्याची वृत्ती यांचा प्रचार आजच्या वाढत्या भौतिकवादी जगाचा नवीन आदर्श म्हणून केला जात आहे, 'यशा'साठी अपरिहार्य असलेली अट म्हणून सांगितल्या जाणाऱ्या या गोष्टीने आपल्या तरुणांच्या मनातून आकांक्षा नावाचा सद्‌गुण फार पूर्वीच पुसून टाकला आहे.
- प्राप्त करण्याची किंवा बनण्याची सूक्ष्म परंतु दृढ इच्छाशक्ती हे गुणवैशिष्ट्य असलेली आकांक्षा नुसत्या यशापेक्षा उत्कृष्टपणाचा पाठपुरावा करण्याचे समर्थन करते.
- महत्त्वाकांक्षा आणि आकांक्षा यांना आत्म्याला वाटणाऱ्या उन्नतीच्या गरजेची पूर्णपणे परस्परविरुद्ध अभिव्यक्ती असे मानता येईल का? मग यातील कोणती गोष्ट माणुसकीचा अर्थ स्पष्ट करते?

## मान्यता

राष्ट्रीय, प्रादेशिक व शालेय स्तरावर बक्षीसे देण्यात येतील.

## नियम व मार्गदर्शक तत्त्वे :

- संस्थेच्या भाग घेऊ इच्छिणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांनी त्यांचे निबंध ३१ ऑगस्ट २०१० पर्यंत शालेय अधिकाऱ्यांकडे जमा करावेत. शाळेने प्रत्येक गटातील पहिले पाच निबंध निवडून ३० सप्टेंबर २०१०च्या आत श्री राम चंद्र मिशनच्या प्रतिनिधीकडे सूपूर्द करावेत व बरोबर स्पर्धेत भाग घेतलेल्या सर्व स्पर्धकांची यादी जोडावी.
- सर्व निबंध A4 मापाच्या कागदावर असावेत व लेखनासाठी केवळ काळ्या किंवा निळ्या शाईचा वापर करावा. सादर केलेल्या कुठल्याही प्रवेशिकेवर कुठल्याही प्रकारच्या खूणा अथवा गुण नसावेत. विद्यार्थ्यांनी कुठल्याही प्रकारचे सचित्र स्पष्टिकरण देण्याचे टाळावे.
- विद्यार्थ्यांना विषयासंबंधी वाचन व संशोधन करण्यास परवानगी व प्रोत्साहन आहे, परंतु सादर केलेले भाग हे त्या विद्यार्थ्याचे स्वत:चे मूळ लेखन असावे आणि त्यात उद्धृत केलेल्या संदर्भ व उताऱ्यांबाबत योग्य तो ऋणनिर्देश केलेला असावा.

**www.sahajmarg.org**